जाक्र.2016/विशा/कक्ष/नियो.2/स.लेखा
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
दिनांक: 19 /10/2016

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद **तथा अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व)
औरंगाबाद विभाग.

विषय: **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालांच्या नियुक्तीच्या अर्जाचे नमुने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयास उपलब्ध करणेबाबत.**

संदर्भ :-1. 'श्री.व्ही.व्ही.गुजर, उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकीर्ण/2016/प्रक्र.37/यो-2 दि.30ऑगस्ट 2016..
2. केंद्र शासनाचे पत्र क्र.No.PAO/Special Cell (RD)2003-04/198 दि.22/6/2004

सन 2016-17,2017-18,2018-19 या तीन वर्षांच्या जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यांत आले आहे. सदरील प्रगटनाची प्रत या पत्रासोबत संलग्न केली आहे. त्या अनुषंगाने सनदी लेखापालांना लेखा परिक्षणासाठी नियुक्त करावयाच्या अर्जाचा नमुना आपल्या कार्यालयास पाठविण्यात येत आहे. संमतीपत्र व अर्जाचा नमुना सनदी लेखापालांनी मागणी केल्यास त्यांना विनामूल्य उपलब्ध करून द्यावा. तसेच सोबत संलग्न जाहीर प्रगटन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या नोटीस बोर्डावर लावावे. जिल्हयातील स्थानिक सनदी लेखापालांना प्राधान्याने नियुक्ती करण्याबाबत शासन सूचना आहेत. त्यामुळे हे जाहीर प्रगटन सर्व स्थानिक सनदी लेखापालांच्या निदर्शनास आणावे.

संदर्भ 2 च्या पत्रातील सूचनांनूसार सनदी लेखापालांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत राबविण्यात येणा-या सर्व योजनंचे लेखा परिक्षण करावयाचे असून याबाबत त्यांना आपल्या स्तरावरून सूचना देवुन सर्व योजने संदर्भात माहिती द्यावी. सोबतच्या प्रपत्र **"अ"** व **"ब"** मध्ये माहिती तसेच प्राप्त अर्ज दिनांक 19/11/ 2016 पर्यंत या कार्यालयास सादर करावेत.

**सोबत:-**
1. जाहीर प्रगटनाची प्रत
2. अर्जाचा नमुना
3. संमतीपत्र
4. प्रपत्र **"अ"** व **"ब"**

**(स्थळप्रतीवर मा.आयुक्त महोदयांची स्वाक्षरी असे)**

( सुर्यकांत ब.हजारे)
**उपआयुक्त, विकास**
**विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद.**

# विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

## जाहीर प्रगटन
## सन 2016

**जाहीरात क्र. 1 : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालांचे अर्ज मागविणे.**

औरंगाबाद विभागातील आठ जिल्ह्यांच्या **(औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद)** जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांच्या कार्यालयांचे सन **2016-2017, 2017-2018 व 2018-2019 या तीन आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणासाठी** प्रत्येक जिल्ह्यातील यंत्रणेसाठी प्रत्येकी आठ याप्रमाणे **सनदी लेखापालांच्या पॅनलची नियुक्ती** शासन पत्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण/2016/प्रक्र 37/योजना-2 दि.30/8/ 2016 अन्वये करावयाची आहे. त्यासाठी नोंदणीकृत सनदी लेखापालाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छूक सनदी लेखापाल हे **सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत** असावेत आणि किमान **तीन वर्षाचे लेखा परिक्षणाचा अनुभव** असावा. लेखा परिक्षणासाठी अर्ज करण्यात येणाऱ्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे **मागील सलग 3 वर्षापासून** अर्ज करणाऱ्या सनदी लेखापालाने **लेखा परिक्षण केलेले नसावे.** तसेच वरील प्रमुख नियम अटींसह शासनाच्या प्रचलित इतर सर्व नियम, अटी / सूचना ज्या सनदी लेखपालास मान्य असतील अशाच सनदी लेखापालांनी औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयातील विकास शाखा किंवा औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या कार्यालयात **विहित नमुन्यात** अर्ज करावेत व अधिक माहितीसाठी जिल्हयातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे संपर्क साधावा.

**लेखा परिक्षणाचे शुल्क खालील प्रमाणे राहतील.**

अ) रुपये 50 कोटी पर्यंत खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी ----------------- रुपये 50,000/-

आ) रुपये 50,00,00,001- ते 75,00,00,000- खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी ---- रुपये 60,000/-

इ) रुपये 75,00,00,000 पेक्षा जास्त खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी------ रुपये 70,000/-

**याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क किंवा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.लेखापरीक्षणामध्ये गट पातळीवरील लेंख्यांचा लेखापरीक्षणामध्ये समावेश राहील.लेखापरीक्षण अहवाल जिल्हा ग्रामीण विकास कार्यालयांस सादर करण्याबाबतची मुदत आणि विहीत मुदतीत अहवाल यंत्रणा कार्यालयास सादर न केल्यास दंड वसुल करणे, यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाशी सनदी लेखापालाने लेखी करार करणे बंधनकारक आहे. सदरच्या करारातील अटींना अधिन राहुन लेखापरीक्षण करणे आवश्यक राहील.जाहीराती संबधी व योजने संदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास संपर्क साधवा.**

1) औरंगाबाद विभागातील प्रत्येक जिल्ह्याच्या **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयात** किंवा **विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद** येथे विहित अर्जाचा नमुना दिनांक **02 /11 /2016** पासुन ते दिनांक **11 /11/2016** पर्यंत कार्यालयीन वेळेत **विनामूल्य** उपलब्ध होईल.

2) **अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक 18/11 /2016 आहे.**

इच्छूक सनदी लेखापालांना विनंती करण्यात येते की, त्यांनी **विहित नमुन्यातील अर्ज** कार्यालयीन वेळेत दिनांक 18/11/2016 पर्यंत **विभागीय आयुक्त कार्यालय, विकास शाखा, औरंगाबाद** येथे किंवा औरंगाबाद विभागातील जिल्हयांच्या **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयात** दाखल करावेत. कोणतेही कारण न दर्शविता अर्ज स्वीकृतीचे किंवा नाकारण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत.

दिनांक :- 19 / 10 /2016

स्थळ :- औरंगाबाद

(सुर्यकांत ब.हजारे)
उपआयुक्त, विकास
विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद

महाराष्ट्र शासन

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती मिळण्यासाठी अर्ज.**

प्रति,

**विभागीय आयुक्त,**

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

विषय:**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ------- चे सन 2016-17,2017-18,2018-19 चे लेखा परिक्षण करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती मिळण्याबाबत अर्ज.**

संदर्भः आपले जाहीर प्रगटन वृत्तपत्र ---- दिनांक / /2016.

**महोदय,**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा ------------- चे सन 2016-17,2017-18, 2018-19 या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखा परिक्षण करण्यासाठी यंत्रणेचे सनदी लेखापाल म्हणून नियुक्ती मिळण्यासाठी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करीत आहे.

| अ. क्र. | **आवश्यक माहितीचे विवरण** | |
|---|---|---|
| 1 | सनदी लेखापालाचे नाव | |
| 2 | फर्मचे नाव | |
| 3 | संपूर्ण पत्ता | |
| 4 | दूरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वनी क्रमांक | 1) कार्यालय |
| | | 2) निवास |
| | | 3) फॅक्स |
| | | 4) ई - मेल पत्ता |
| | | 5) भ्रमणध्वनी क्र. |
| 5 | सनदी लेखापाल नोंदणी क्रमांक --<br>दिनांक-- | |
| 6 | व्यवसायाचे ठिकाण /संपुर्ण पत्ता | |
| 7 | शैक्षणिक गुणवत्ता | |
| 8 | अनुभवाचा कालावधी (वर्षे) व त्याविषयी वर्षनिहाय तपशिल किमान तीन वर्ष अनुभव आवश्यक **(प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे)** | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | उपलब्ध व्यावसायिक कर्मचारीवर्ग (स्वतंत्र प्रपत्र जोडणे आवश्यक) | अ .क्र | कर्मचाऱ्याचे नाव | शैक्षणिक अर्हता | अनुभव | शेरा |
| | | | | | | |
| 10 | सध्या कोणत्या जिल्हयात काम करतात त्या जिल्हयाचे नाव | | | | | |
| 11 | ज्या यंत्रणेचे लेखा परिक्षण करावयाचे आहे त्या यंत्रणेचे नाव | | | | | |
| 12 | या पूर्वी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे लेखा परिक्षण केले ते वर्ष नमूद करावे तसे अनुभवाचे प्रमाणपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे. | | | | | |
| 13 | ज्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे लेखा परिक्षणासाठी अर्ज केला आहे, त्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे मागील सलग 3 वर्षापासून (2013-14,2014-15,2015-16)चे लेखा परिक्षण केले आहे काय?<br>1. असल्यास कोणत्या वर्षात?<br>2. नसल्यास संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे मागील सलग 3 वर्षापासून लेखा परिक्षण केले नसल्याचे (प्रकल्प संचालकांच्या स्वाक्षरीचे) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | | | | | |
| 14 | शासन अटी, नियम मान्य असल्याबाबतचे संमती पत्रे जोडले आहे काय (होय / नाही) | | | | | |
| 15 | खालील तीन वर्षाचे आयकर क्लिअरन्स प्रमाणपत्र जोडले आहे काय? (होय / नाही)<br>सन 2013-2014 | | | | | |
| | सन 2014-2015 | | | | | |
| | सन 2015-2016 | | | | | |
| 16 | इतर आवश्यक माहिती असल्यास (प्रमाणपत्र / पुराव्यांसह) | | | | | |

कार्यालयाचा शिक्का
दिनांक

(सनदी लेखापालाची सही)
नाव ------------------
पत्ता ------------------
भ्रमणध्वनी क्र.----------------

## संमतीपत्र

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यासंबंधातील

**अटी व नियम**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी ग्राम विकास विभागाचे पत्र क्रमांक एमडी /1099/सीआर/713/42, दिनांक 08 जून 2001 व समक्रमांकाचे पत्र दिनांक 21 एप्रिल 1999, दिनांक 18 मे 1999 आणि दिनांक 22 जुलै 2002 तसेच शासन पत्र क्रसंकीर्ण/2011/प्रक्र 12/योजना-2 दि.24 मार्च 2011परिपत्रातील अटी व नियमांचे संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे आहे.

1) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या **सर्व योजनांचे ( केंद्र / राज्य)** लेखा परिक्षण योजनानिहाय करून योजनानिहाय **लेखा परिक्षण** अहवाल यंत्रणेस सादर करणे. योजनांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- 1.SGSY/MSRLM 2.IAY & Other Habitational Schemes (viz.upgradation, Credit Cum Subsidy, PMGRY) 3.DPAP 4.Hariyali 5.IWDP 6.DRDA(Administration) 7.TRYSEM/Mini ITI 8. Payment of Extension Officer 9. Housing for fisheries 10.PURA (Providing Urban Amenities in Rural Areas ) 11.BPL Survey 12.About unspent balances of DRDA Old schems 13.Rajiv Gandhi Nivara Yojna 14.Rashtriya Samavikas/BRFG 15.Any other Centre/ State schemes implemented through DRDA. या व्यतिरीक्त यंत्रणा राबवित असलेल्या सर्व योजनांबाबतचा तपशील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून प्राप्त करून घ्यावा.

2) यंत्रणांच्या लेखा परिक्षणामध्ये गट पातळीवरील लेख्यांचा समावेश राहील.

3) सनदी लेखापाल यांनी, लेखा परिक्षण शासनाने विहित केलेल्या शुल्कात करून देणे आवश्यक आहे. शासनास विहित केलेले लेखा परिक्षण शुल्क खालीलप्रमाणे आहे.

अ) रुपये 50 कोटी पर्यंत खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी ----------- रुपये 50,000/-

ब) रुपये 50,00,00,001- ते 75,00,00,000- खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी --रुपये 60,000/-

क) रुपये 75,00,00,000 पेक्षा जास्त खर्च असलेल्या यंत्रणा कार्यालयासाठी ----- रुपये 70,000/-

या शुल्का व्यतिरिक्त सनदी लेखापालास अन्य कोणत्याही कारणास्तव **कसलाही भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

4) सनदी लेखापालाने त्यांच्या अहवालात केंद्र शासनाचे पत्र क्र.No.PAO/Special Cell (RD)2003-04/198 दि.22/6/2004 च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून बाबी प्रमाणित करणे आवश्यक आहे, तसेच सनदी लेखापालाने लेखा परिक्षण अहवालात खालील बाबी प्रामुख्याने प्रमाणीत करणे आवश्यक आहे.

a) योजनेचे सर्व अद्ययावत **मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून** त्या अनुषंगाने लेखा तपासणी केलेली आहे.

b) केंद्र शासनाने वितरित केलेले अनुदानाचे प्रमाणात राज्य शासनाने अनुदान वितरित केलेले आहे. (अनुदान वितरणाच्या निश्चित प्रमाणानूसार) तसे नसल्यास सविस्तर कमी / जास्त निधिचा तपशील.

c) लेखा तपासणी कालावधीत योजनेचा पैसा ज्या बॅंकेत ठेवला आहे त्या **बॅंकेशी ताळमेळ** घालणे.

d) **जिल्हास्तरावरील सर्व तालुक्यासाठी एकत्रित मत्ता नोंदवही** अद्यावत ठेवण्यात आली आहे.

e) कोणत्याही अग्रीम रक्कमा परस्पर खर्च करुन दाखविण्यात आलेल्या नाहीत तसेच एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी दिलेल्या अग्रीमाचा अहवालात अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

f) वरील प्रमाणपत्राशिवाय त्या त्या योजनेकरिता आवश्यक असणारी प्रमाणपत्रे लेखापालाने द्यावीत.

g) एका योजनेचा **निधी अन्य योजनेकडे वळविण्यात आलेला नाही.या बाबतचे प्रमाणपत्र**

h) एका योजनेसाठी एकच बॅंक खाते ठेवण्यांत आलेले असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

5) केंद्र शासनाचे सुधारित लेखांकन पध्दती नियम 1984 मधील मार्गदर्शक नियम 27 (बी) नुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखा परिक्षणासाठी सनदी लेखापालाने **मागील सलग 3 वर्षांपासून (2013-14,2014-15,2015-16 या वर्षात) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे लेखा परिक्षण केलेले नसावे.**
6) वरील प्रमाणपत्रांशिवाय संबंधित योजनेकरिता आवश्यक असलेले लेखा संबंधित प्रमाणपत्रे सनदी लेखापालांनी द्यावेत.
7) सनदी लेखापालांनी प्रत्येक योजनानिहाय स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल प्रत्येक वर्षी 31 **ऑगस्ट पूर्वी सहा प्रतीत** यंत्रणेस सादर करण्याचे **बंधनकारक** राहील.
8) मुदतीत लेखा परिक्षण अहवाल सादर न करणा-या सनदी लेखापालाच्या शुल्कातून **10 टक्के** रक्कम कपात करण्यात येईल
9) सनदी लेखापालास अहवाल जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या कार्यालयास सादर करण्याबाबतची मुदत आणि विहित मुदतीत अहवाल सादर न झाल्यास दंड वसुल करणे तसेच लेखा परिक्षणासाठी निश्चित केलेल्या शुल्का व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क/कर किंवा इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाही यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाशी सनदी लेखापालाने लेखी करार करावा सदरील करारनाम्यामध्ये शासन सदरील करारनामा सबळ कारणावर कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणू शकेल याचा समावेश राहील.
10) सनदी लेखापलास विभागीय आयुक्त कार्यालयास अर्ज करताना तो **विहित नमुन्यात** करावा लागेल. (अर्जासोबत प्रत्येक बाबींचा पुरावा म्हणून **सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र जोडण्यात** यावे.)
    a) सनदी लेखापाल सक्षम प्राधिकाऱ्याकडे **(Institute of Chartered Accountants of India) नोंदणीकृत** असावा.
    b) सनदी लेखापाल ज्या जिल्ह्यात काम करीत आहे त्या जिल्हयाचा संपूर्ण कार्यालयाचा पत्ता
    c) सनदी लेखापालास किमान **तीन** वर्षांचा अनुभव असावा. अर्जासोबत सनदी लेखापालानी त्यांचे अनुभव व लेखा परिक्षणाविषयी अनुभव प्रमाणपत्र देणे गरजेचे आहे.
    d) सनदी लेखापालांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे लेखा परिक्षण करण्यापूर्वी त्यांचे संबंधित लेखा परिक्षण केल्याचे प्रमाणपत्र.
    e) शासन निर्णयाप्रमाणे विहित केलेले नियम अटी मान्य असल्याबद्दल करारपत्र.
    f) शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे 2014-15,2015-16 च्या वर्षांचे **आयकर** भरल्याचे प्रमाणपत्र.

वरील सर्व **1 ते 10 नियम व अटीचे मी वाचन केले असून शासनाचे सर्व नियम / अटी व भविष्यात शासनाने / विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या सूचना, नियम व अटी, नियमातील फेरबदल मला मान्य राहतील, तसेच याबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांशी करारनामा करण्यास हे संमतीपत्र देत आहे.** कोणतेही कारण न दर्शविता अर्ज स्वीकृत करण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार विभागीय आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत. या बाबत माझा कसलाही आक्षेप राहणार नाही.

सनदी लेखापालांशी करारनामा करताना शासन सदर करारनामा सबळ कारणावरून कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणू शकेल.

कार्यालयाचा शिक्का
दिनांक

(सनदी लेखापालाची सही)
नाव ------------------
पत्ता ------------------